नियमीत फौ. ख. क्र. ७४/२०२३
सरकार -वि.- राहूल व इतर
नि.क्र. २५.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - प्रकाश फकीरा धाडसे,
वय ४५ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

<u>**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस. एस. मोरे यांचे मार्फत**</u>

१. मी आरोपींना ओळखत नाही. दिनांक २४.०९.२०२३ रोजी पोलिसांनी मला समन्स दिला नव्हता. मी जात असताना माझी सही घेतली. माझ्या समक्ष कुठलीही कारवाई केली नव्हती. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीला **नि.क्र.२६** देण्यात येते. दि.०४.१०.२०२३ रोजी पोलिसांनी मला बोलाविले नव्हते. त्यावेळी माझ्या समक्ष कुठलीही कारवाई केली नव्हती. आता मला काटा पावती दाखविण्यात आली त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीला **नि.क्र.२७** देण्यात येते. दि.२८.०९.२०२३ रोजी पोलिसांनी मला पोलीस स्टेशन येथे बोलाविले नव्हते. आरोपीने माझ्या समक्ष कुठलेही निवेदन दिले नव्हते. आता मला निवेदन पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीला **नि.क्र.२८** देण्यात येते.

सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २४.०९.२०२३ रोजी पोलिसांनी मला मालेवाडा फाटा, भिवापुर येथे पंचनाम्याकरिता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष एक रेतीचा टिप्पर क्रमांक एम.एच. ४०-बी.एल.४७१८ व त्यामध्ये

६ ब्रास रेती आरोपीच्या ताब्यातुन जप्त केली होती. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी तसा घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला व मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, अयुब खान पठान घटनास्थळ पंचनाम्याच्यावेळी माझ्यासोबत होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.२८.०९.२०२३ रोजी पोलिसांनी मला पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते, राहूल खेरवार याने माझ्या समक्ष निवेदन दिले होते ते पोलिसांनी नोंदवून घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी ते निवेदन मला वाचून दाखविले व माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी अक्षय रामटेके हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला वाचनविण्यासाठी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री हुंगे यांचे मार्फत</u>

३. नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,
स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.

दिनांक – ०९.०१.२०२६